म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

संग्रहालय क्रमांक

९८२

पुस्तकाचें नांव

2

धर्म

श्रीगजानन.

# श्री

# आशौचविचार

## महाराष्ट्रभाषेंत गुरुशिष्याचा संवाद

## रूपानें लिहितों

प्र० — गुरुजी, मला आचार आणि व्यवहार सांगीतला परंतु जननाशौच, मृताशौच आणि अस्पर्श यांचा विचार सांगीतला नाहीं याकरितां तो कृपा करून सांगावा ?

उ० — काय तुजला प्रश्न करावयाचा असेल तो कर.

प्र० — जननाशौच ह्मणजे काय ?

उ० — आपली स्त्री अथवा आपले प्रत्यक्ष पुत्राची, अथवा सापिंडापासून आपण मुलगा दत्तक घेतला अथवा सापिंडाला दिला, अथवा सोदकापासून घेतला अथवा दिला, अथवा सगोत्राचा मुलगा घेतला अथवा दिला, अथवा परगोत्राचा मुलगा दत्तक घेतला अथवा दिला त्याची स्त्री अथवा आपली कन्या अथवा आपण दत्तक घेतली अथवा दिली, अथवा बहीण अथवा सापिंडाची स्त्री

अथवा

अथवा सापिंडानीं सापिंडापासून दत्तक घेतला
अथवा दिला, अथवा त्या सापिंडानीं सोदकापास
न दत्तक मुलगा घेतला अथवा दिला, अथवा स
गोत्र्यापासून मुलगा दत्तक घेतला अथवा दिला,
अथवा परगोत्र्याचा मुलगा घेतला त्याची स्त्री अ
थवा त्याची कन्या, अथवा सोदकाची स्त्री अथ
वा सोदकानें सापिंडापासून दत्तक घेतला अथवा
सापिंडांत दिला, अथवा आपले सगोत्रांतला घे
तला अथवा दिला, अथवा त्या सोदकानें परगो
त्र्यापासून मुलगा दत्तक घेतला त्याची स्त्री अथ
वा सगोत्र्याची स्त्री, अथवा सगोत्र्यांनीं सापिंडा
तला घेतला अथवा मुलगा दत्तक दिला, अथवा
सगोत्र्यानें परगोत्र्याचा मुलगा दत्तक घेतला त्या
ची स्त्री अथवा आपणापासून नीचजातीचे
स्त्रियेस अपत्य झाल्यास अथवा आपल्या सा
पिंडापासून नीच स्त्रियेस अपत्य झाल्यास आप
णअशुधपणानें राहणें, आणि ओवळें जे इतरज
न यांना स्पर्श केला असतां दोष नाहीं त्याला ह्मण
तात यासच लोकांत वृद्धी, वृद्धावळें, सोहेर. अथवा
सुएर असें ह्मणतात.

प्र० — अशुधपणा तो काय ?

उ० — ब्राह्मणानीं षट्कर्मे करावीं, आणि क्ष

त्रिय

त्रिय आणि वैश्य याणीं तीन कर्में करावीं, आणि स्त्रिया, सत्छूद्र आणि शूद्रादिक याणीं देव, गाई, तुळस आणि ब्राह्मण इत्यादिकांची पूजा ब्राह्मणांचा मुखानें पुराणोक्त मंत्र ऐकून तंत्रोक्त विधीनें करावी ह्मणोन शास्त्र आहे, त्याप्रमाणें तीं सगळीं न करण्यास जो अनधिकार त्याला ह्मणतात.

प्र० — सोहेरांत कर्में कोणी कशि करावीं.

उ० — ब्राह्मणानीं मंत्रोच्चार न करितां अर्घ्या पर्यंत प्राणायामाव्यतिरिक्त, अथवा उपस्थाना पर्यंत मंत्रोच्चार न करितां संध्या करावी, आणि क्षत्रिय आणि वैश्य याणीं पूर्वोक्त जो संध्येचा प्रकार तोच स्वीकारावा आणि सोहेरा निमित्त जीं कर्में प्राप्त झालीं तीं मात्र वेदोक्त मंत्रानीं करावीं, आणि स्त्रियांनीं उक्त तंत्रोक्त विधि न करणें आणि सत्छूद्रादिकानीं सोहेर निमित्त जीं कर्में प्राप्त झालीं तीं मात्र तंत्रोक्त विधीनें करावीं.

प्र० — सोहेर निमित्त जीं कर्में प्राप्त झालीं तीं ब्राह्मण क्षत्रिय आणि वैश्य याणीं वैदीक मंत्रानीं आणि सत्छूद्रादिकानीं तंत्रोक्त विधीनें करावी ह्मणोन सांगितलीं तीं कर्में कोणतीं आणि तीं कोणी करावीं ?

उ० — प्रथम दिवसीं जातकर्म संस्कार आणि

पांचवे

पांचवे आणि साहावे दिवसीं जन्मदाख्य देवता पूजन, जी स्त्री प्रसूत होत्ये तिचा भ्रतारानें करावें तोनसल्यास कोणी एकानें करावें.

प्र० — स्त्रियांणीं सोयेर धरावानोकिती?

उ० — जा स्त्रिया प्रसूत होतात त्याणीं दाहा दिस रजस्वले प्रमाणें राहून अकरावेदिवसीं स्नान त्यावर पुत्रातें प्रसवल्या असल्यास वीस दिव आणि कन्येतें प्रसवल्यास तीस दिवस सोहेर रून एकतिसावे दिवसीं स्नान करून शुध व्हावें. त्या स्त्रियांचे अपूर्ण गर्भ झाल्यास त्या स्त्रियानं सोहेर किती दिवस धरावा तें पुढें सांगेन. इतर स्त्रियानीं पती सारिखा सोहेर धरावा.

प्र० — जा प्रसूत होतात त्याणीं दहा दिवस र स्वलेप्रमाणे सोहेर धरावा म्हणोन सांगीतलें आहे याचें कारण काय?

उ० — त्या स्त्रियांचा रजाचा स्राव होतो याकरि

प्र० — त्या स्त्रियेचा दहा दिवसांचे आंत अथवा नर स्राव राहिल्यास जितके दिवस स्राव होत अर ल तितके दिवस सोहेर रजस्वले सारिखा धराव किं काय?

उ० — दहा दिवसच धरावा. दहा दिवसांचे आंत अथवा नंतर राहिल्यास व्याधीनें झाला

सें जाणावे.

प्र० — व्रतबंधा पूर्वी ब्राह्मणादिकांचें मुलांना,आणि लग्ना पूर्वी सर्व हिंदु वर्णाचे मुलीनां,आणिसच्छूद्रादिकांचे मुलाना कोणतेंहि कर्म करण्यास अधिकार नाहीं, त्यापेक्षां त्याना सोहेर आहे किंवा नाहीं. आणि सोहेर धरावा असें असल्यास कोणत्या प्रकारचा धरावा.

उ० — ब्राह्मणाचे मुलीना, आणिं मुलाना आठ, क्षत्रियाचे मुलाना,आणि मुलीना बारा, आणि वैश्यादिकाचे मुलाना सोळा वर्षा,पूर्वीं आणि वैश्यादिकाचे मुलीना रजोदर्शना पूर्वी सोहेर नाहीं. उक्त वर्षा पुढे, व्रतबंध, अथवा लग्न जाले नसेल तत्रापित्याणि सर्वांचा सोहेर धरावा तो,असा कीं इतर जे शुची याना स्पर्श न करावा.

प्र० — व्रतबंधजाल्यावर सोड मुंजि पूर्वीसोहेर आहे किंवा नाहीं

उ० — त्याना सोहेर नाहीं,आणि त्याणी अशुचिचे हातचे उदकादिकाचे सेवन करूनये.

प्र० — तो केव्हां पासून धरावा ?

उ० — प्रसूत होत्ये त्याच दिवसा पासून धरावा.

प्र० — गर्भ बाहेर अर्धा आला आहे. आणि कांहीं प्रहरानीं मुक्त गर्भ झाला, त्या गर्भाचा प्रथ

भ

म दिवस केव्हां पासून धरावा?

उ० — सुख दर्शना पासून प्रथम दिवस धरावा.

प्र० — रात्रीस प्रसूत जाल्यास प्रथम दिवस केव्हां पासून धरावा?

उ० — रात्रीस प्रसूत जाली तर रात्रीचे तीन विभाग करावे, आणि पहिले दोन विभागांत प्रसूत जाल्यास दोन विभागाचे पूर्वीचा जो दिवस तो जाणावा, तिसरे भागांत जाल्यास तिसरे भागा पुढें जो दिवस येणार तो प्रथम जाणावा; अथवा रात्रिचीं दोन खंडें करावीं, आणि प्रथम खंडात प्रसूत जाल्यास पहिले खंडाचे पूर्वींचा जो दिवस तो प्रथम जाणावा. दुसरे खंडांत प्रसूत जाल्यास द्वितिय खंडा नंतर जो दिवस येणार तो प्रथम धरावा, कोणी ऋषीचें मत एक देशीअसें आहे, कीं सूर्योदया पूर्वी प्रसूत झाल्यास पूर्व दिवस धरावा. ह्मणोन आहे, परंतु या देशांत रुढ नाहीं या करितां एतद्देशीय याणीं या ऋषीचें मत चलिवणे अप्रशस्त.

प्र० — सापिंड ह्मणजे काय?

उ० — प्रथम पुरुषा पासून आठ पुरुष पर्यंत आपले गोत्रांत झाले ते.

प्र० — सोदक ह्मणजे कोणास ह्मणतात?

उ० — आठवे पुरुषापासून पंधरावे पुरुषापर्यंत आपले गोत्रांत झाले ते.

प्र० — सगोत्र कोणास ह्मणतात

उ० — पंधरावे पुरुषापासून एकवीस पुरुष पावेतों आपले गोत्रांत झाले ते, अच्छूद्रादिकांना गोत्र नाहीं यास्तव त्यांना सगोत्र नाहीं, या करितां त्यांचा पंधरावे पुरुषापासून ॰ पुरुष त्यांना सोहेर आणि आशौच नाहीं,

प्र० — आपली स्त्री प्रसूत झाली असतां सोहेर किती दिवस धरावा.

उ० — प्रसूत होतांच स्नान करावें, आणि दाहा दिवस सोहेर धरावा, अकरावे दिवसीं स्नान करून शुद्ध व्हावें

प्र० — प्रत्यक्ष पुत्राची अथवा सापिंडाचा दत्तक घेतला, अथवा सापिंडाना दिला, याची स्त्री प्रसूत झाल्यास किती दिवस सोहेर धरावा?

उ० — ते पुत्र आपले सापिंड होत, यास्तव दाहा दिवस सोहेर धरावा. अकरावे दिवसीं स्नान करून शुद्ध व्हावे.

प्र० — सोदकाचा मुलगा आपण दत्तक घेतला त्याची स्त्री प्रसूत झाल्यास सोहेर किती दिवस

धरावा ?

उ० — त्या पुत्राच्या तीन पिढ्या होई तों पर्यंत तीन दिवस धरावा, चवथे पिढी पासून दाहा दिवस सोहेर धरावा.

प्र० — सोदकांना आपला मुलगा दत्तक दिला त्याची स्त्री प्रसूत झाल्यास आपण सोहेर किती दिवस धरावा ?

उ० — तीन दिवस धरावा.

प्र० — सगोत्राचा मुलगा आपण दत्तक घेतला त्याची स्त्री प्रसूत झाल्यास सोहेर किती दिवस धरावा ?

उ० — त्या पुत्राचा तीन पिढ्या पर्यंत तीन दिवस सोहेर धरावा, त्या पुत्राचे चवथे पिढी पासून दाहा दिवस धरावा.

प्र० — सगोत्र्याला मुलगा दत्तक दिला त्याची स्त्री प्रसूत झाली तर सोहेर आपण किती दिवस धरावा ?

उ० — त्या पुत्राचा तीन पिढ्या पर्यंत तीन दिवस, चवथे पिढी पासून स्नान करून शुद्ध व्हावे. अथवा एक दिवस धरावा.

प्र० — परगोत्र्यापासून आपण मुलगा दत्तक घेतला त्याची स्त्री प्रसूत झाल्यास सोहेर किती

दिवस धरावा ?

उ० — त्या पुत्राचा तीन पिढ्या पर्यंत तीन दिवस, चवथे पिढी पासून दाहा दिवस सोहेर धरावा.

प्र० — पर गोत्र्याला आपला मुलगा दत्तक दिला त्याची स्त्री प्रसूत झाल्यास सोहेर धरावा किंवा नाहीं ?

उ० — त्या पुत्राचा तीन पिढ्या पर्यंत तीन दिवस सोहेर धरावा. चवथे पीढी पासून सोहेर धरूं नये.

प्र० — आपली कन्या प्रसूत झाल्यास सोहेर किती दिवस धरावा ?

उ० — तीन दिवस धरावा.

प्र० — आपण दत्तक घेतली कन्या ती प्रसूत झाल्यास सोहेर किती दिवस धरावा ?

उ० — सापिंडाची घेतली असल्यास आणि ती आपले येथे प्रसूत झाल्यास येक दिवस धरावा. इतरांची घेतल्यास, अथवा पतिग्रहीं प्रसवल्यास सोंहेर नाहीं.

प्र० — आपण कन्या दुसऱ्यास दिल्ही ती प्रसवल्यास सोहेर धरावा किंवा नाहीं.

उ० — आपले एथे झाल्यास येक दिवस धरावा. पतिग्रहीं झाल्यास सोहेर नाहीं.

प्र० — बहिण प्रसूत झाल्यास आपण सोहेर धरावा.

कीं या नाहीं.

उ० — आपले येथें प्रसूत झाल्यास येक दिवस तीची बहीण आपलेच एथें असल्यास तिला, येक दिवसहि नाहीं. ती आपले नवऱ्याचे येथें अथवा इतर ठिकाणीं प्रसूत झाल्यास सोहेर नाहीं.

प्र० — सापिंडाची स्त्री, सापिंडानें सापिंडाचाच मुलगा दत्तक घेतला, अथवा सापिंडालाच दिला त्याची स्त्री प्रसूत झाल्यास, सोहेर किती दिवस धरावा?

उ० — दाहा दिवस धरावा.

प्र० — सापिंडानें सोदकाचा मुलगा दत्तक घेतला त्याची स्त्री प्रसूत झाल्यास किती दिवस धरावा

उ० — त्या पुत्राचा तीन पिढ्या पर्यंत तीन दिवस चवथे पिढी पासून दाहा दिवस सोहेर धरावा.

प्र० — सापिंडानें सोदकाला मुलगा दत्तक दिला त्याची स्त्री प्रसूत झाल्यास सोहेर किती दिवस धरावा?

उ० — तीन दिवस धरावा.

प्र० — सापिंडानें सगोत्राचा मुलगा दत्तक घेतला त्याची स्त्री प्रसूत झाल्यास सोहेर किती दिवस धरावा?

उ० — तीन पिढ्या होई तों पर्यंत येक दिवस. चवथें पिढी पासून दाहा दिवस सोहेर धरावा.

धर्म



प्र० — सापिंडानें सगोत्र्यास मुलगा दत्तक दिला. त्याची स्त्री प्रसूत झाल्यास सोहेर किती दिवस धरावा?

उ० — स्नान करून शुद्ध व्हावें अथवा येक दिवस धरावा.

प्र० — सापिंडानें परगोत्र्याचा मुलगा दत्तक घेतला. त्याची स्त्री प्रसूत झाल्यास सोहेर किती दिवस धरावा?

उ० — त्याचा तीन पिढ्या पर्यंत येक दिवस चवथे पिढीपासून दाहा दिवस धरावा.

प्र० — सापिंडाची कन्या प्रसूत झाली असतां सोहेर किती दिवस धरावा?

उ० — ती आपले बापाचे येथें प्रसूत झाल्यास आणि ती आपले जवळचे तीन पुरुषांतल्याची असल्यास येक दिवस सोहेर धरावा.

प्र० — सोदकाची स्त्री अथवा सोदकानें आपले सापिंडातला मुलगा दत्तक घेतला अथवा, सापिंडाला च दिला, त्याची स्त्री प्रसूत झाल्यास सोहेर किती दिवस धरावा?

उ० — तीन दिवस धरावा.

प्र० — सोदकानें आपले सगोत्रातला मुलगा दत्तक घेतला त्याची स्त्री प्रसूत झाली असतां सोहेर

हेर किती दिवस धरावा ?

उ० — तीन पिढ्या पावेतों येक दिवस अथवा स्नान करावें. चवथें पिढीपासून तीन दिवस. धरीत जाणे.

प्र० — सोदकानें सगोत्र्याला मुलगा दिला त्याची स्त्री प्रसूत झाल्यास सोहेर किती दिवस धरावा ?

उ० — स्नान करावें किंवा येक दिवस धरावा.

प्र० — सोदकानें परगोत्र्यांतला मुलगा घेतला त्याची स्त्री प्रसूत झाल्यास सोहेर किती दिवस धरावा ?

उ० — तीन पिढ्या त्या पुत्राचा होई तोंपर्यंत स्नान करून शुद्ध व्हावें चवथें पिढीपासून तीन दिवस धरावा.

प्र० — सगोत्र्याची स्त्री अथवा सगोत्र्यानें आपले सांपिंडांतला पुत्र दत्तक घेतला अथवा दिला त्याची स्त्री प्रसूत झाल्यास सोहेर किती दिवस धरावा ?

उ० — स्नान करावें अथवा येक दिवस धरावा

प्र० — सगोत्र्यानें परगोत्र्याचा मुलगा दत्तक घेतला त्याची स्त्री प्रसूत झाल्यास सोहेर किती दिवस धरावा ?

उ० — त्या पुत्राचा तीन पिढ्या पर्यंत सोहेर ध

नये चवथे पिढी पासून स्नान करून शुद्ध व्हावें अथवा येक दिवस धरीत जावा.

प्र० — जितके जितके दिवस सोहेर धरावयास सांगितले तितके दिवस प्रसूत होऊन गेल्या नंतर समजल्यास सोहेर धरावा किंवा नाहीं?

उ० — जी स्त्री प्रसूत होत्ये तिचा सवतीनें आणि तिचा नवऱ्याने मात्र पुढें ऐकिल्यास सोहेर निमित्त स्नान करावें इतरांस स्नानादिक नाहीं.

प्र० — प्रथम दिवसी न समजून जितके दिवस सोहेर धरावयास सांगितलें त्याचे मध्यें समजल्यास त्याणी सोहेर किती दिवस धरावा?

उ० — सोहेराचे जे शेष दिवस राहिले असतील तितके दिवस धरावा.

प्र० — कोणी स्त्री स्वग्रही असून कुलटा आहे आणि प्रसूत झाल्यास सोहेर धरावा किंवा नाहीं?

उ० — ती आपले जातीपेक्षां ऊंच किंवा समान जातीशी रत असल्यास आणि स्वग्रही प्रसवल्यास त्या स्त्रीचे पतीने तीन व सापिंडानीं येक दिवस धरावा अन्य ठिकाणीं प्रसूत झाल्यास त्या स्त्रीचे नवऱ्याने येक दिवस धरावा. सापिंडानीं स्नान करावें सोदकादिकास सोहेर नाहीं. घटस्फोट केला असल्यास सोहेर नाहीं.

प्र० — ठेवलेली अथवा दासी अथवा नाटकशाळा आपल्यापासून गर्भ धारण होउन प्रसूत झाल्यास सोहेर किती दिवस धरावा ?

उ० — तिचीजाती आपल्यापेक्षां नीच किंवा समान असल्यास आणि ती अन्य पुरुषाकडे जात नसल्यास आणि ती आपले येथें प्रसूत झाल्यास तीन दिवस इतर ठिकाणीं झाल्यास येक दिवस धरावा.

प्र० — पित्याचे समागमाने नीच स्त्री प्रसूत झाल्यास सोहेर किती दिवस धरावा ?

उ० — आपले येथें प्रसूत झाल्यास येक दिवस धरावा. इतर ठिकाणीं झाल्यास स्नान करावें.

प्र० — स्त्रियेचा गर्भ तीन महिन्याचे आंत नाश झाल्यास त्या स्त्रियादिकानी सोहेर किती दिवस धरावा ?

उ० — त्याला स्राव ह्मणावा तो झाला असतां तीने रजस्वले सारखा तीन दिवस धरावा. पतिने. आणि सापिंडानीं स्नान करावे.

प्र० — स्त्रियेचा गर्भ चवथे महिन्यांत स्राव झाल्यास स्त्रियादिकानीं सोहेर किती दिवस धरावा

उ० — तिने चार दिवस रजस्वले सारखा सोहेर धरावा. पतिनें आणि सापिंडानीं स्नान करावें.

प्र० — पाचवें आणि साहावें महिन्यांत स्त्रिचा गर्भ पतन झाल्यास त्याला काय ह्मणाचें? आणि तो झाल्यास स्त्रियेने आणि तिचा पती त्यादिकानीं सोहेर कितीं दिवस धरावां?

उ० — त्याला गर्भ पात ह्मणावा. तो झाल्यास जितक्या महिन्यांचा गर्भ पात झाला असेल तितके दिवस रजस्वले सारखा सोहेर धरावा. त्या स्त्रियेच्या दाहा दिवस सोहेर धरणारानीं तीन. व तीन दिवस धरणारानीं येक दिवस धरावा.

प्र० — सातवे, आठवे, आणि नवमादिक महिन्यांत गर्भ पतन झाल्यास त्याला काय ह्मणावें, आणि तो झाल्यास सोहेर किती दिवस धरावा?

उ० — त्याला गर्भ प्रसव ह्मणावा, तो झाल्यास स्त्रियादिकानीं पूर्ण सोहेर धरावा. तो गर्भ उत्पन्नच, अथवा उत्पन्न होऊन नाल छेदना पूर्वीं मृत झाल्यास मृताशौच निमित स्नान करावें. जी प्रसूत होते तिणें दाहा दिवस सोहेर रजस्वलेसारखा धरावा. त्या स्त्रीयेच्या दाहा दिवस सोहेर धरणारानीं तीन. व तीन दिवस धरणारानीं येक दिवस सोहेर धरावा.

# मृताशौचविचार

प्र०— मृताशौच ह्मणजे कशास ह्मणतात?

उ०— सन्याशी, अथवा, वानप्रस्थ्या खेरीज कोणी मृत जाल्यास अशुध्धपणाने राहाणे, त्याला संस्कृतांत मृताशौच ह्मणतात. आणि लोकांत अशौचं अथवा सुतक असे ह्मणतात.

प्र०— हे अशौच कोणीं धरावे?

उ०— पुरुषानीं आणि स्त्रियानीं धरावे, ब्राह्मण क्षत्रिय आणि वैश्य यांचे मुलानीं व्रतबंधा पूर्वी आणि सर्व वर्णाचे मुलींच्या व *सत्छुद्रादिकांचे मुलांच्या व्रतबंधस्थानां पल्ल विवाह संस्कार होय या करिता मुलींनी व सत्छूद्रादिकांचे मुलानीं विवाहा पूर्वी धरूं नये. अन्य कर्त्ता नसल्यास कर्म करण्या निमित्त धरावें. अथवा व्रतबंधाचा अथवा विवाहाचा काळ जननाशौचांत सांगीतला आहे त्या त्या काळांत व्रतबंध अथवा विवाह जाला नसल्यास धरावे.

---

* व्रतबंध संस्कारवत् स्त्रियाना आणि सत्छूद्रादिकाना विवाह संस्कार जाणावा असें शास्त्र आहे यास्तव ज्या स्थली व्रतबंधा पूर्वी येईल त्या स्थलीं सत्छूद्रादिकांनीं विवाहा पूर्वी असें जाणावें आणि ज्या स्थली व्रतबंधा नंतर येईल त्या स्थलीं विवाहनंतर असें जाणावें.

प्र० — ब्राह्मण क्षत्रिय आणि वैश्य यांचे मुला नीं ब्रह्मचर्याश्रमात कोणी मृत जाल्यास अशौच धरावें, किंवा नाहीं?

उ० — अन्य कर्म कर्ता असल्यास धरूं नये. सोडमुंज होतांच मात्र माता पित्याचें तीन दिवस धरावें, अथवा स्नान करावें, अन्या विषयीं स्नान करावें, कर्ता नसल्यास ब्रह्मचर्यावस्थेंतही अशौच धरावें.

प्र० — अशुद्धपणा कशास ह्मणतात? आणि तें प्राप्त जालें असतां काय काय करूं नये.

उ० — ब्राह्मणानीं षट्कर्में करावीं, क्षत्रिय आणि वैश्य यांणीं तीन कर्में करावीं असें शास्त्र आहे, त्याप्रमाणें सगळीं न कर्णे आणि स्त्रियानीं व सच्छूद्रादिकांनीं देवादिकांची पुजा ब्राह्मणाचे मुखाने पुराणोक्त मंत्र ऐकून करावीं ह्मणोन शास्त्र आहे, तीं न कर्णें त्याला ह्मणतात आणि ब्राह्मण इत्यादिकानी आणि ब्राह्मण क्षत्रिय आणि वैश्य याचे मुलानीं व्रतबंधा पूर्वीं आणि सर्व वर्गांच्या मुलांनी आणि सच्छूद्रादिकाचें मुलीनी विवाहा पूर्वीं इतर जे शुची याना स्पर्श करूं नये, व ब्रह्मचारी यांणीं शुचीं आणि अशुचीं याना स्पर्श करूं नये, व स्त्री संग करूं नयें आणि मिष्टान,

व दूधं व उडीद यांचे भक्षण व लवण आहे जा पदार्थांत त्याचें व सच्छूद्रादिकानीं मांसाचें सेव न करूं नयें, व पुनर्भोजन करूं नयें व पलंगाव किंवा गादीवर शयन करूं नये. व येका हातरूं वर अनेकानी निद्रा करूं नये, आणि नाना प्रकाचें जे उपभोग त्यांचा स्वीकार करूं नये,

प्र० — अशक्तानें मिष्टांनादिकांचा स्वीकार करावा किंवा न करावा?

उ० — निरुपायास्तव करावा.

प्र० — अशुद्धपण्यांत कोण कोणतीं कर्में करावी?

उ० — ब्राह्मणं, क्षत्रियं, आणि वैश्य याचे मुलानीं व्रतबंधापूर्वी निरुपायास्तव अंत्य कर्म करणें प्राप्त जालें तेंवढें समंत्रक अवश्य विधीया करिता करावें. व्रतबंध जाल्यावर ब्रह्मचर्याश्रमांत संध्या. सायं प्रातर्होम आणि अंत्य कर्म मात्र करावे. सोडमुंज जाल्यावर ब्राह्मणानीं अर्घ्यापर्यंत प्राणायामा वांचून मंत्रोच्चार न करितां मंत्र ध्यानांत आणून किंवा उपस्थानापर्यंत संध्या आणि महामंत्राचा जप दाहा वेळ मानसिकच करावा. पूजेचा नीयम असल्यास मानसिक करावी, आणि मंत्रोच्चार करून अंत्य कर्म करावे, आणि क्षत्रिय आ

वैश्य यांची सोडमुंज झाल्यावर संध्येचा प्रथम प्रकार सांगीतला आहे त्याचाच स्वीकार करावा, आणि ब्राह्मण क्षत्रिय आणि वैश्य यांचे मुलींनीं विवाहापूर्वीं अथवा विवाह झाल्यावर निरुपायास्तव अंत्यकर्म करणे प्राप्त झाल्यास मात्र समंत्रक अवश्य विधी याकरिता करावें, सच्छूद्रादिकांचे पुरुषानीं अथवा स्त्रियानीं विवाहो पूर्वीं अथवा विवाहानंतर अंत्यकर्म करणें प्राप्त झालें, तेंवदें तंत्रोक्त विधानें करावें.

प्र० — अंत्यकर्म सर्वानी करावें. किंवा येकानें करावें?

उ० — येकानें करावें.

प्र० — तें अशौच केव्हां पासून धरावे.

उ० — अग्निहोत्री मृत झाल्यास त्याचें समंत्रक दहन झाल्यापासून धरावें, व आपल्या हाताने आपल्या जिवाचा नाश करून घेतला. व जा प्रेताला अन्य नीच जातीनीं वाहिलें. किंवा खनन किंवा दहन केलें त्याचें व भ्रष्ट स्त्री झाली परंतु तीचा घटस्फोट केला नाहीं आणि मरण पावली तीचें. किंवा पुरुष भ्रष्ट झाला परंतु घटस्फोट केला नाहीं आणि मरण पावला त्याचें अथवा राजानें मारिला त्याचें अथवा नपुंसक पुरुष अथवा नपुंसक

सक स्त्रीयेचें पाल्हाइा विधी झाल्यापासून आणि एत व्यतिरिक्तांचें आणोरकमण झाल्यापासून अशौच धरावें.

प्र० — रात्रीस मरण पावल्यास प्रथम दिवस कोणता धरावा?

उ० — दिवस धरण्याचा विचार जननाशौचांत सांगितला आहे त्याप्रमाणेंच धरावा.

प्र० — मातापितरांचें अशौच पुत्रानें किती दिवस धरावें?

उ० — प्रथम दिवशी समजल्यास दाहा दिवस. प्रथम दिवसानंतर दाहा दिवसांचे आंत समजल्यास दाहा दिवस होण्यास जे शेष दिवस राहिले असतील तितके दिवस धरावें. दाहा दिवसांनंतर कधींही समजलें तत्रापि दाहा दिवस धरावें.

प्र० — सापत्न माता मृत झाल्यास पुत्रानें अशौच किती दिवस धरावें?

उ० — प्रथम दिवशी समजल्यास दाहा दिवस धरावें. प्रथम दिवसानंतर दाहा दिवसांचे आंत समजल्यास दाहा दिवस होण्यास जे शेष दिवस राहिले असतील तितके दिवस धरावे. दाहा दिवसांनंतर कधींही समजलें तत्रापी तीन दिवस

धरावें.

प्र० — माता. सापत्न माता. किंवा पिता यांणीं आपला पुत्र सापिंडाला दत्तक दिला आणि मृत झालें त्याचें अशौच दत्तक झालेल्या पुत्रानें किती दिवस धरावें ?

उ० — प्रथम दिवशी समजल्यास दाहा दिवस. प्रथम दिवशी न समजल्यास दाहा दिवस होण्या स जे शेष दिवस राहिले तितके दिवस धरावें. दाहा दिवसानंतर तीन महिन्या पर्यंत. अथवा संकट असल्यास पंचेचाळीस दिवस पर्यंत ऐकिल्यास तीन दिवस. तीन महिन्या पुढें. अथवा पंचेचाळीस दिवसा पुढें गत महिन्या सुद्धां अथवा गत देवसा सुद्धां साहा महिन्याचें आंत ऐकिल्यास पक्षिणीं. अथवा पंचेचाळीस दिवसानंतर पंचेचाळीस दिवसा सुद्धां साहा महिन्याचे आत ऐकिल्यास येक दिवस धरावें. साहा महिन्या पुढें गत महिन्या सुद्धा नऊ महिन्याचें आत. ऐकिल्यास अहोरात्र. अथवा रात्रीस समजल्यास प्रातःकाळ अथवा दिवसास समजल्यास नक्षत्र दर्शन पर्यंत धरावें. नऊ महिन्यापुढें गत महिन्यासुद्धां वर्ष होई तों पर्यंत समजल्यास स्नान करावें. अथवा येक रात्र धरावें. अथवा रात्रीस समजल्यास

प्रातःकाल.दिवसास समजल्यास नक्षत्र दर्शन
पावेतो धरावें. वर्षापुढें कधींहीं ऐकिल्यास स्ना
न करावें, कोणी ऋषीचें मत असें आहे किं द
हा दिवसांनंतर देशांतरीं मृत झालें - ह्मणोन ऐ
किल्यास स्नान करावें. परंतु तें देशांतर ब्राह्
णाना ऐशीं. क्षत्रिय. वैश्य. आणि सच्छूद्राना
शाण्णव. आणि शूद्रादिकाना. दोनशे चाळी
कासापुढें जाणावें.

प्र० — मातापित्यानी त्याणी आपले सापिंड
पासून पुत्र दत्तक घेतला आणि ते घेणारे मृत
झाले त्याचें अशौच किती दिवस धरावें.

उ० — जनक पूर्व घरचें मातापित्याचें अशौ
च धरावयास सांगीतले आहे, त्या प्रमाणेंच
अशौच धरावें. कर्म करावयाचें असल्यास
प्रथम दिवशी समजल्यास दाहा दिवस. प्रथम
दिवसानंतर दाहा दिवसाचें आंत ऐकिल्यास
दाहा दिवस होण्यास जे दिवस राहिले अस
तील तितके दिवस धरावें. आणि दशाहांत
कर्म करावें. दाहा दिवस झाल्यावर कधांही
ऐकिल्यास कर्म करण्या निमित्त तीन. अथवा
दाहा दिवस अशौच धरावें.

प्र० — मातापित्यानी सोडकाला दत्तक दि

ला आणि देणारे मृत झाले तर अशौच किती धरावें?

उ० — प्रथम दिवशीं ऐकिल्यास तीन दिवस. दुसरें किंवा तीसरें दिवशीं ऐकिल्यास तीन दिवस होण्यास जे शेष दिवस राहिले असतील. तितके दिवस धरावें. तीन दिवस होऊन गेल्यावर ऐकिल्यास स्नान करावे.

प्र० — माता पित्यानीं आपले सोदका पासून पुत्र दत्तक घेतला आणि ते घेणार मृत झाले तर त्यांचें अशौच किती दिवस धरावें?

उ० — पूर्व धर्चे माता पित्याचें अशौच धरावयास सांगीतलें आहें, त्या प्रमाणेच अशौच धरावें. परंतु कर्म कर्णे असल्यास कधींहीं ऐकिल्यास कर्म कर्ण्या निमित्त तीन अथवा दाहा दिवस धरावें.

प्र० — माता पित्यानीं सगोत्र्याना दत्तक दिला आणि ते देणारे मृत झाले तर अशौच किती दिवस धरावे?

उ० — प्रथम दिवशीं ऐकिल्यास तीन दिवस. दूसरें अथवा तीसरे दिवशीं ऐकिल्यास तीन दिवस होण्यास जे शेष राहिले असतील तितके दिवस धरावे. तीन दिवस होउन गेल्यावर ऐकिल्यास स्नान करावें. चवथे पिढी पासून स्नान करीत जावें अथवा

एक दिवस धरीत जावें.

प्र० — माता अथवा पित्यानीं आपले सगोत्रापासून पुत्र दत्तक घेतला आणि ते दत्तक घेणारे मृत झाल्यास अशौच किती दिवस धरावे?

उ० — पूर्व घर्चे माता पित्याचे अशौच धरावयास सांगीतले आहे त्या प्रमाणेच धरावें. कर्म करणें असल्यास तें करण्या निमित्त कधीही ऐकिल्यास तीन अथवा दाहा दिवस धरावें.

प्र० — माता पित्यानीं परगोत्र्यास दत्तक दिला आणि देणारे मृत झाले तर अशौच धरावा किंवा नाहीं?

उ० — प्रथम दिवशी ऐकिल्यास तीन दिवस धरावें दुसरे अथवा तीसरे दिवशी ऐकिल्यास तीन दिवस होण्यास जे शेष दिवस राहिले असतील तितके दिवस धरावें. तीन दिवस होउन गेल्या वर ऐकिल्यास स्नान करावें. या प्रमाणे तीन पिढ्या होई तों पर्यंत धरीत जावें. चवथ पिढी पासून धरूनयें.

प्र० — माता अथवा पित्यानी परगोत्र्या पासून पुत्र दत्तक घेतला आणि दत्तक घेणारे मृत झाल्यास त्यांचें अशौच किती दिवस धरावे?

उ० — प्रथम दिवशीं ऐकिल्यास तीन दिवस धरावें. दुसरे अथवा तीसरे जे दिवस राहिले असतील, तितके दिवस धरावें. तीन दिवसां नंतर ऐकिल्यास स्नान करावें. कर्म करणे राहिलें असल्यास कर्म कर्ण्या निमित्त तीन. अथवा दाहा दिवस अशौच धरावें.

प्र० — प्रत्यक्ष पुत्राचें अशौच माता. सापत्नमाता. आणि पिता याणीं किती दिवस धरावें?

उ० — उत्पन्न झाल्या पासून दाहा दिवसांत मृत झाल्यास स्नान करावें. दाहा दिवसांनंतर व्रतबंध होण्या पूर्वीं मृत झाल्यास तीन दिवस धरावें दुसरे अथवा तीसरे दिवशीं ऐकिल्यास तीन दिवस होण्यास जें शेष दिवस राहिले असतील तितके दिवस धरावें. तीन दिवसानंतर समजल्यास स्नान करावें. व्रतबंधा नंतर मृत झाला तर प्रथम दिवशी समजल्यास दाहा दिवस प्रथम दिवसांनंतर दाहा दिवसांचे आंत समजल्यास दाहा दिवसाना जे शेष दिवस राहिले असतील. तितके दिवस धरावें. दाहा दिवसां नंतर कधींही ऐकिल्यास तीन दिवस धरावें.

प्र० — सापिंडाला आपला मुलगा दत्तक दिला किंवा सापिंडापासून मुलगा घेतला तो पुत्र मृत

झाला तर देणारें किंवा दत्तक घेणारे जे माता पि
ता त्याणी दिलेल्यां किंवा घेतल्या पुत्राचें अशौच
किती दिवस धरावें ?

उ० — दाहा दिवसांनंतर नाम करणाचे पूर्वीं
मृत झाल्यास स्नान करावें नाम करणानंतर सा
हा महिन्याचें आंत. अथवा दांत येण्याचे पूर्वीं
मृत झाल्याचे खनन केल्यास स्नान करावे. दह
न केल्यास येक दिवस धरावें. साहा महिन्यानंतर
अथवा दांत आल्यानंतर चुडा संस्कार होण्यापूर्वी
अथवा चुडा संस्कार न झाल्यास तीसरे वरीष हो
ण्याचे आंत मृत झाल्यास येक दिवस. तीन वर्षा
नंतर व्रतबंध होण्या पूर्वीं मृत झाल्यास प्रथम दि
वसीं समजल्यास तीन दिवस. दुसरें किंवा तीसरे
दिवशी ऐकिल्यास तीन दिवस होण्यास जे शेष दिव
स अथवा प्रहर राहिले असतील तितके धरावे. ती
न दिवसांनंतर ऐकिल्यास स्नान करावें. व्रतबंधा
तर मृत झाला तर पूर्व वर्ने सापिंड माता पित्यान्चें
अशौच धरण्याचा विस्तार सांगीतला आहे त्या प्र
णेंच धरावयाचें जाणावें.

प्र० — सोदकाला आपला मुलगा दत्तक दि
नंतर तो पुत्र मृत झाल्यास दत्तक देणारे जे त्या
णी दत्तक दिलेल्या पुत्राचें अशौच किती दिव

धरावे?

उ० — दाहा दिवसानंतर तीन वर्षांचे आंत मृत झाल्यास स्नान करावें, तीन वर्षानंतर व्रतबंध होण्या पूर्वी मृत झाला आणि त्याच दिवशी समजल्यास येक दिवस धरावें प्रथम दिवसानंतर ऐकिल्यास स्नान करावें व्रतबंधानंतर मृत झाला आणि त्याच दिवशी समजल्यास तीन दिवस धरावें, प्रथम दिवसानंतर दूसरे अथवा तीसरे दिवसी ऐकिल्यास तीन दिवस होण्यास जे शेष दिवस अथवा प्रहर राहिले असतील तितके धरावें तीन दिवसानंतर समजल्यास स्नान करावे.

प्र० — सोदकापासून मुलगा घेतला तो पुत्र मृत झाल्यास अशौच किती दिवस धरावे?

उ० — त्या पुत्राचे पूर्व घरचे मातापिता जितके दिवस अशौच धरतात तितकें तीन पिढ्यापर्यंत धरीत जावें त्यापुत्राचे चवथ्या पिढीपासून सापिंड्याचा पुत्र घेतला त्याचे अशौच धरावयाचा विस्तार सांगीतला आहे त्या प्रमाणे धरीत जावें

प्र० — सगोत्र्याला आपला मुलगा दत्तक दिल्हा आणि तो पुत्र मृत झाल्यास दत्तक देणारे जे मातापिता त्याणी दत्तक दिल्हे त्या पुत्राचें अशौच किती दिवस धरावें?

उ० — दाहा दिवसांनंतर तीन वर्षांचे आंत मृतझाल्यास स्नान करावें. तीन वर्षानंतर व्रतबंध पूर्वी मृत झाला आणि त्याच दिवशीं समजल्यास येक दिवस. प्रथम दिवस गेल्यावर ऐकिल्यास स्नान करावें व्रतबंध झाल्यावर मृत झाला आणि प्रथम दिवशी समजल्यास तीन दिवस धरावें. दुसरें अथवा तीसरे दिवशीं ऐकिल्यास तीन दिवसहे ण्यासजे शेष दिवस असतील तितके दिवस धरावें. तीन दिवसांनंतर ऐकिल्यास स्नान करावें या प्रमाणे त्या पुत्राचा तीन पिढ्या पर्यंत अशौच धरीत जावें. चवथ्ये पिढीपासून येक दिवस अथवा स्नान करावें.

प्र० — सगोत्र्याचा मुलगा दत्तक घेतला तो पुत्र मृत झाल्यास दत्तक घेणारे जे माता पिता. त्यांणी घेतल्या पुत्राचें अशौच किती दिवस धरावें?

उ० — त्या पुत्राचें पूर्व घरचें माता पित्यानीं अशौच जितके दिवस धरावें ह्मणोन सांगीतलें आहे तितके दिवस त्या पुत्राचा तीन पिढ्यापर्यंत धरीत जावें. चवथ्यें पिढी पासून सापिंडाचा पुत्र घेतला त्याचें अशौच धरावयाचा विस्तार सांगीतला आहे त्याच प्रमाणे धरीत जावें.

प्र० — परगोत्र्याला आपला मुलगा दत्तक दिल्हा आणि तो पुत्र मृत झाल्यास दत्तक देणारे जे मातापिता त्याणी दत्तक दिल्हेल्या पुत्राचे अशौच धरावें किंवा नाहीं?

उ० — दाहा दिवसानंतर तीन वर्षाचे आंत मृत झाल्यास स्नान करावें तीन वर्षानंतर व्रतबंध होण्या पूर्वी मृत झाल्याला आणि प्रथम दिवशी समजल्यास येक दिवस धरावें प्रथम दिवसानंतर ऐकिल्यास स्नान करावें व्रतबंधानंतर मृत झाल्यास प्रथम दिवशी समजल्यास तीन दिवस धरावें. दुसरे अथवा तीसरे दिवशी ऐकिल्यास तीन दिवस होण्यास जे शेष दिवस अथवा प्रहर राहिले असतील तितके धरावें. आणि तीन दिवसानंतर समजल्यास स्नान करावें या प्रमाणें तीन पिढ्यापर्यंत धरीत जावे त्या पुत्राच्या चवथ्या पिढीपासून धरूं नये.

प्र० — परगोत्र्याचा मुलगा दत्तक घेतला तो पुत्र मृत झाल्यास अशौच किती दिवस धरावे?

उ० — त्या पुत्राचे पूर्व घरचे मातापित्यानी अशौच जितके दिवस धरावें ह्मणोन सांगितलें आहे तितके दिवस त्या पुत्राचा तीन पिढ्यापर्यंत धरीत जावे व चवथ्ये पिढीपासून दाहा दिवस धरावें.

प्र० — आई बापाचे अशौच कन्येने किती दिवस धरावे?

उ० — मृत होऊन दाहा दिवसाचे आंत समजल्या तीन दिवस दाहा दिवसानंतर येक वर्षाचे आंत ऐकिल्यास पक्षिणी धरावें वर्षापुढें समजल्यास स्नान करावे.

प्र० — पक्षिणी अशौच कशास ह्मणतात?

उ० — बारा प्रहर अशौच धरणें त्याला ह्मणतात.

प्र० — कन्या मृत झाल्यास अशौच किती दिवस धरावे?

उ० — दाहा दिवसानंतर तीन वर्षाचे आं[illegible] मेल्यास येक दिवस तीन वर्षानंतर मेल्यास तीन दिवस तीन दिवसानंतर ऐकिल्यास स्नान करावे.

प्र० — सवतिची किंवा सापिंडाची मुलगी दत्त[illegible] घेतली अथवा सापिंडाला आपली दत्तक दि[illegible]ल्ही ती मुलगी मृत झाल्यास अशौच किती दिवस धरावें

उ० — दाहा दिवसानंतर तीन वर्षाचे आंत मृत झाली असता स्नान करावे. तीन वर्षानं[illegible]र मागणी पूर्वी मृत झाली आणि त्याच दिव[illegible]

—ऐकीस येक दिवस वाद्रानानंतर विवाहा होण्यापूर्वी मृत झाली आणि प्रथम दिवशीं समजल्यास तीन दिवस धरावे. दुसरे अथवा तीसरें दिवशीं ऐकिल्यास जे शेष दिवस राहिले असतील तितके दिवस धरावें तीन दिवसांनंतर समजल्यास स्नान करावें. विवाहानंतर आपले येथें मृत झाल्यास एक दिवस. नवऱ्याचे येथें मृत झाल्यास अथवा दुसरे दिवशीं ऐकिल्यास स्नान करावें.

प्र० — सापत्न माता, दत्तक घेणारी माता अथवा दत्तक देणारी माता मृत झाल्यास कन्येनें अशौच धरावें किंवा नाहीं?

उ० — स्नान करावें.

प्र० — बायको मृत झाल्यास भ्रतारानें किंवा भ्रतार मृत झाल्यास बायकोनें अशौच किती दिवस धरावें?

उ० — प्रथम दिवशीं समजल्यास दाहा दिवस. प्रथम दिवशीं न समजल्यास दाहा दिवसांला शेष जे दिवस राहिले तितके धरावे दाहा दिवसांनंतर कधीहीं ऐकिल्यास दाह दिवस धरावें.

प्र० — सवतीचें अशौच सवतीनें किती दिवस धरावें?

उ० — बायकोचें अशौच भ्रतारानें धरण्याचा वि

स्तार सांगीतला आहे त्या प्रमाणें धरावें.

प्र० — प्रत्यक्ष पुत्राची सापिंडापासून पुत्र दत्तक घेतला. किंवा सापिंडाला आपला पुत्र दत्तक दिला त्याची स्त्री ती आपली सून ती मृत झाल्यास अशौच किती दिवस धरावें?

उ० — सापिंडाचा पुत्र दत्तक घेतला त्याणें आपले जनक माता पित्याचें अशौच धरण्याचा विस्तार सांगीतला आहे त्या प्रमाणे याचे धरावें.

प्र० — सोदक सगोत्री किंवा परगोत्री यापासून मुलगा दत्तक घेतला त्याची स्त्री मृत झाल्यास अशौच किती दिवस धरावें?

उ० — त्या सुनेंचा तीन पिढ्यापर्यंत प्रथम दिवशी समजल्यास तीन दिवस दुसरे किंवा तीसरे दिवशी ऐकिल्यास तीन दिवस होण्यास जे शेष दिवस राहिले असतील तितके धरावें. तीन दिवसां नंतर समजल्यास स्नान करावें. चवथे पीढी पासून सापिंडाचा मुलगा दत्तक घेतला त्याणे जनक माता पित्याचें अशौच धरण्याचा विस्तार सांगीतला आहे त्या प्रमाणे याचें धरीत जावें.

प्र० — आपला मुलगा सोदकास दत्तक दिला त्य पुत्राचे स्त्रीचे अशौच किती दिवस धरावें?

उ० — प्रथम दिवशीन समजल्यास तीन दुसरे

किंवा तीसरे दिवशीं ऐकिल्यास तीन दिवस हो
ल्यास जे शेष दिवस राहिले तीनके धरावें. तीन
दिवसांनंतर समजल्या स्नान करीन जावें.

प्र० — सगोत्र्यास मुलगा दत्तक दिला त्याचें स्त्रीचें
अशौच किती दिवस धरावें?

उ० — तीचा तीन पिढ्यापर्यंत प्रथम दिवशीं ऐकि
ल्यास तीन. दुसरे. किंवा तीसरे दिवशीं समजल्यास
जे शेष राहिले असतील तीतके धरावें. चवथ्ये पि
ढीपासून प्रथम दिवशीं. ऐकिल्यास स्नान करावें. किंवा
ऐक दिवस धरावें.

प्र० — परगोत्र्यास मुलगा दत्तक दिला त्याचें स्त्रीचें
अशौच धरावें किंवा न धरावें.

उ० — तीचा तीन पिढ्यापर्यंत प्रथम दिवशीं ऐ
किल्यास तीन. दुसरे किंवा तीसरे दिवशीं. समज
ल्यास जे शेष दिवस राहिले असतील तितके धरावें
चवथ्ये पिढीपासून न धरावें.

प्र० — सासू सापत्न सासू. किंवा सासऱ्याचें अशौच
सुनेनें किती दिवस धरावे?

उ० — सुनेचें अशौच सासऱ्यानें. धरण्याचा विस्ता
र सांगितला आहे त्या प्रमाणेच धरावें.

प्र० — सापिंड. किंवा सापिंडाची स्त्री मृत झाल्यास
अशौच किती दिवस धरावें?

उ० — सापिंडाचा मुलगा दत्तक घेतला त्याणें जनक मातापित्याचें अशौच धरण्याचा विस्तार सांगितला आहे त्या सारखें धरावें.

प्र० — सापिंडाचा प्रत्यक्ष किंवा सापिंडानें सापिंडाला दत्तक मुलगा घेतला अथवा सापिंडाला मुलगा दत्तक दिला त्या मुलाचें अशौच किती दिवस धरावें?

उ० — सापिंडाला आपला मुलगा दत्तक दिला तो मृत झाला असतां अशौच धरण्याचा विस्तार सांगीतला आहे तद्वत त्याचेंहीं धरावें.

प्र० — सापिंडानें सोदकाचा मुलगा दत्तक घेतला त्याचें अशौच किती दिवस धरावें?

उ० — सोदकाला मुलगा दत्तक दिला त्याचें अशौच धरण्याचा विचार उक्त आहे त्या सारखें तीन पिढ्यापर्यंत धरावें. चवथे पिढी पासून सापिंडाचे पुत्राचें अशौचाप्रमाणे धरावें.

प्र० — सापिंडानें सोदकाला पुत्र दत्तक दिला त्याचें अशौच किती दिवस धरावें?

उ० — दाहा दिवसांनंतर तीन वर्षांचे आत मृत झाल्यास स्नान करावें. तीन वर्षानंतर व्रतबंध होण्या पुर्वी मृत झाल्यास आणि प्रथम दिवशीं समजल्यास येक दिवस धरावें द्वितियादि दिव

ऐकिल्यास स्नान करावे. व्रतबंधानंतर मृत झालाआ
णि तेच दिवशी ऐकिल्यास तीन. दुसरें. किंवा तीसरे
त्यादि दिवशी ऐकिल्यास त्री रात्र होण्यास जे शेष
दिवस राहिले असतील तीतके धरावें. तीन दिवस
पुढें ऐकिल्यास स्नान करावें.

प्र० — सापिंडाने सगोत्र्याच्या किंवा परगोत्र्याच्या
मुलगा दत्तक घेतला त्याचें अशौच किती दिवस
धरावे ?

उ० — व्रतबंधापूर्वी मरण पावल्यास स्नान करा
वें. व्रतबंधोत्तर मृत होऊन तेच दिवशी ऐकिल्या
स एक दिवस धरावे. द्वितीयेत्यादि दिवशी ऐकि
ल्यास स्नान या प्रमाणे त्याच्या तीन पिढ्या पर्यंत
धरावें. चवथे पिढी पासून सापिंडाचें पुत्राचें अशौ
चा प्रमाणे धरावें.

प्र० — सापिंडानें सगोत्र्यास मुलगा दत्तक दिला
त्या पुत्राचें अशौच किती दिवस धरावे ?

उ० — व्रतबंधानंतर मृत झाला आणि त्याच दि
वशी ऐकिल्यास स्नान करावें किंवा येक दिवस धरावें.

प्र० — सापिंडाचा कोणी येका मुलाचे स्त्री येचें
अशौच किती दिवस धरावें ?

उ० — जी स्त्री मृत होते तीचे भ्रताराचे अशौच
व्रतबंध झाल्यावर मृत झाल्यास जीतके दिवस

धरावे. ह्मणोन उक्त आहे तदनुसार धरावें.

प्र० — सापिंडाची कन्या मृत झाल्यास अशौच कि
ती दिवस धरावें ?

उ० — दाहा दिवसानंतर तीन वर्षांचे आंत मृत
झाल्यास जवळचें सापिंडातील तीन पुरुषानी स्नान
करावें. तीन वर्षानंतर मागणी होण्या पूर्वी मृत झा
ल्यास जवळचें सापिंडातील तीन पुरुषानी येक दि
वस वाग्दानानंतर विवाह होण्या पूर्वी मृत झाल्या
स उभयकुल सापिंडानी प्रथम दिवशी समजल्यास
तीन दिवस. दुसरे अथवा तीसरे दिवशी ऐकिल्या
स जे शेष दिवस राहिले असतील तितके दिवस ध
रावें तीन दिवस होऊन गेल्यावर समजल्यास अ
शौच नाहीं. विवाह झाल्यावर ती बापाचें येथे मृत
झाल्यास आणि तें प्रथम दिवशी ऐकिल्यास जवळ
चें तीन पुरुषानी येक दिवस धरावें.

प्र० — सोदक अथवा सोदकाची स्त्री मृत झाल्या
स अशौच किती दिवस धरावें ?

उ० — प्रथम दिवशी ऐकिल्यास तीन दिवस ध
वें. दूसरे अथवा तीसरे दिवशी ऐकिल्यास तीन
वस होण्यास जे शेष दिवस राहिले असतील
तके दिवस धरावें, तीन दिवसानंतर समजल्या
स सुतक नाहीं पाहिजे असल्यास स्नान करावें.

प्र० — सोदकाचा पुत्र अथवा सोदकाने त्याने आपले सापिंडातला मुलगा दत्तक घेतला किंवा त्याणं आपले सापिंडाना दिल्हा तो मृत झाल्यास अशौच किती दिवस धरावे?

उ० — चूडा संस्कार अथवा चूडा संस्कार न झाल्यास तीन वर्षा पूर्वी मृत झाल्यास आणि प्रथम दिवशी समजल्यास स्नान करावे चूडा संस्कार झाल्यावर अथवा चूडा संस्कार न झाल्यास तीन वर्षानंतर मृत झाल्यास आणि तेच दिवशी ऐकिल्यास येक दिवस धरावें दुसरे दिवशी ऐकिल्यास स्नान करावे व्रतबंध झाल्यावर मृत झाल्यास आणि तेच दिवशी ऐकिल्यास तीन दिवस धरावें दुसरे किंवा तिसरे दिवशी ऐकिल्यास त्रीरात्रीस जे शेष राहिले ते धरावे. तीन दिवस होऊन गेल्यावर ऐकिल्यास स्नान करावें.

प्र० — सोदकाने सगोत्र्याचा मुलगा दत्तक घेतला तो मृत झाल्यास अशौच किती दिवस धरावें?

उ० — व्रतबंधानंतर मृत झाल्यास आणि ते प्रथम दिवशी समजल्यास स्नान करावें अथवा येक दिवस धरावें याप्रमाणे तीन पिढ्यापर्यंत धरीत जावें चवथे पिढी पासून सोदकाचे प्रत्यक्ष मुलाचे अशौचाप्रमाणे याचेही धरीत जावें.

प्र० — सोदकाने सगोत्र्याला मुलगा दत्तक दिल्हा तो मृत झाल्यास अशौच किती दिवस धरावे?

उ० — व्रतबंधानंतर मृत झाल्या ते प्रथम दिवशी ऐकिल्यास स्नान करावें अथवा येक दिवस धरीत जावें.

प्र० — सोदकाने परगोत्र्याचा मुलगा दत्तक घेतला तो मृत झाल्यास अशौच किती दिवस धरावें?

उ० — व्रतबंधानंतर मृत झाल्यास आणि ते प्रथम दिवशीच ऐकिल्यास स्नान करावें. याप्रमाणे तीन पिढ्यापर्यंत करीत जावें. चवथे पिढीपासून सोदक पुत्राचे अशौच धरण्याचा विस्तार सांगीतला आहे तदुक्त धरीत जावें.

प्र० — सोदकांचे मुलच्या स्त्रिया मृत झाल्यास अशौच किती दिवस धरावे?

उ० — ते पुत्र व्रतबंध झाल्यानंतर मृत झाल्यास जितके दिवस अशौच धरावे लागते तितकेच दिवस त्यांच्या स्त्रियांचेंही धरीत जावें.

प्र० — सगोत्री अथवा सगोत्र्याची स्त्री मृत झाल्यास अशौच किती दिवस धरावें?

उ० — प्रथम दिवशी ऐकिल्यास स्नान करावें अथवा येक दिवस धरावे

प्र० — सगोत्र्याचा मुलगा अथवा सगोत्र्याने

त्याणें आपले सापिंडानला मुलगा दत्तक घेतला, अथवा त्याणें आपले सापिंडाला दिल्हा, तो मृत झाल्यास अशौच किती दिवस धरावें?

उ० — व्रतबंधापूर्वी मृत झाल्यास अशौच नाहीं व्रतबंधानंतर मृत झाल्यास आणि ते प्रथम दिवशीं ऐकिल्यास स्नान करावें, अथवा येक दिवस धरावें

प्र० — सगोत्र्यानें परगोत्र्याचा मुलगा दत्तक घेतला त्याचें अशौच किती दिवस धरावें?

उ० — त्याच्या तीन पिढ्यापर्यंत न धरावें, चवथे पिढीपासून स्नान करावें. अथवा येक दिवस धरावें.

प्र० — सगोत्र्याचे कन्याचें आशौच किती दिवस धरावें?

उ० — सगोत्र्याचे पुत्र व्रतबंधोत्तर मृत झालेअसतां आशौच धरण्याचा विस्तार उक्त आहे तद्वत् धरावें.

प्र० — भगिनीचें आशौच भावानें किती दिवस धरावें.

उ० — तीन वर्षांची होण्यापूर्वी मृत झाल्यास स्नान. तदुत्तर वाग्दानापूर्वी मृत झाली आणि तेच दिवशीं ऐकिल्यास येक दिवस. वाग्दानोत्तर विवाह होण्यापूर्वीं मृत झालीं आणि त्याच दिवशीं ऐकिल्यास तीन दिवस द्वितीयेत्यादि दिवशीं ऐकिल्यास जे शेष राहिले तितके नंतर समजल्यास स्नान. विवाहानंतर आपले एथें मृत झाल्यास वाग्दानोत्तराप्रमाणे धरावें. इतर

ठिकाणी काळ झाल्यास आणि तेंच दिवशीं ऐकिल्या स पक्षिणी धरावें.

प्र० — भाचाचें आशौच बहिणीनें किती दिवस धरावें.

उ० — तीन वर्षांचा होण्यापूर्वी मृत झाल्यास स्नान. नंतर व्रतबंधापूर्वी मृत झाल्यास आणि त्याच दिवशीं ऐकिल्यास येक दिवस. व्रतबंधोत्तर सांनिध्य असता मृत झाल्यास तीन दिवस. इतर स्थळीं मृत झाल्यास आणि त्याच दिवशीं ऐकिल्यास पक्षिणी आशौच धरण्याचा कालातिक्रम झाल्यास स्नान करावें.

प्र० — मामा किंवा मामीचें आशौच भाचा आणि भाचीनें किती दिवस धरावें.

उ० — त्यानी उपकार केला असल्यास सोदकाचे प्रत्यक्ष पुत्राचें आशौच धरण्याचा विस्तार उक्त आहे तद्वत् धरावें. उपकार केला नसल्यास आणि त्याच दिवशीं ऐकिल्यास पक्षिणी धरावें. पक्षिणी आशौच धरण्याचा कालातिक्रम झाल्यास स्नान करावें.

प्र० — भाचा किंवा भाचीचें आशौच मामानें आणि मामीनें किती दिवस धरावें?

उ० — व्रतबंधापूर्वी भाचा आणि लग्नापूर्वी भाची मृत झाल्यास आणि त्याच दिवशीं ऐकिल्यास पक्षिणी धरावें. कालातिक्रम झाल्यास स्नान करावें. व्रतबंधोत्तर भाचा आणि विवाहोत्तर भाची मृत झाल्यास सो

दकानें आशौच धरण्याचा विस्तार उक्त आहे तद्वत् धरावें.

प्र० — मावशीनें आशौच भाचा आणि भाचीनें किती दिवस धरावें ?

उ० — सोदकाचें प्रत्यक्षपुत्राचें आशौच धरण्याचा प्रकार सांगितला आहे तद्वत धरावें.

प्र० — भाचा किंवा भाचीचें आशौच मावशीनें किती दिवस धरावें ?

उ० — मातुलानें भाचाचें आशौच धरण्याचा विस्तार सांगितला तद्वत् धरावें.

प्र० — आईचा पित्याचें किंवा आईचा मातेचें आशौच कन्येचा पुत्रानें व मुलीनें किती दिवस धरावें ?

उ० — सोदकाचें आशौच्याचा विस्तार सांगितला त्याप्रमाणे धरावें.

प्र० — कन्येचे पुत्राचें व कन्येचें आशौच किती दिवस धरावें ?

उ० — मातुलानें भाचाचें आशौच धरण्याचा विस्तार सांगितला आहे त्याप्रमाणें धरावें.

प्र० — सासू सासऱ्याचें आशौच जांवयानें किती दिवस धरावें ?

उ० — व्रतबंध झालेल्या बंधूचें आशौच भगिनीनें धरण्याचा विस्तार उक्त आहे तद्वत् धरावें. ग्रामांतरीं मृत झाल्यास स्नान करावें.

प्र० - जांवयाचें आशौच सासूसासऱ्यांनी कितीदिवस धरावें ?

उ० - स्नान करावें. कोणी कर्मी ह्मणतात कीं प्रथम दिवशीं समजल्यास येक दिवस दुसरे दिवशीं ऐकिल्यास स्नान करावें.

प्र० - बायकोचे भावाचें आशौच किती दिवस धरावें

उ० - प्रथम दिवशीं ऐकिल्यास येक दिवस धरावें.

प्र० - आतेचें आशौच भाच्याने आणि भाचीने किती दिवस धरावें ?

उ० - प्रथम दिवशीं समजल्यास पक्षिणी धरावें. पक्षिणीचा कालातिक्रम झाल्यास स्नान करावें.

प्र० - बापाचा आतेभाऊ, मामेभाऊ, माउसभाऊ, किंवा मातेचा आतेभाऊ, मामेभाऊ, माउसभाऊ, किंवा आपला आतेभाऊ, मामेभाऊ, माउसभाऊ, यांतून कोणी मृत झाल्यास आशौच किती दिवस धरावें ?

उ० - आतेचें आशौच धरण्याचा विस्तार सांगितला आहे तद्वत् धरावें.

प्र० - आईची आतेबहीण, मामेबहीण, किंवा माउसबहीण, किंवा बापाची आतेबहीण, मामेबहीण किंवा माउसबहीण, किंवा आपली आतेबहीण, मामेबहीण, किंवा माउसबहीण, यांतून कोणी मृत झाल्यास आशौच किती दिवस धरावें ?

उ० – प्रथम दिवशीं समजल्यास येक दिवस धरावें. द्वितीय दिवशीं ऐकिल्यास किंवा अविवाहित मृत झाल्यास स्नान करावें.

प्र० – वहिणीचें आशौच भगिनीनें किती दिवस धरावें?

उ० – रुढी पाहतां तीन दिवस. अथवा पक्षिणी धरितात; परंतु प्राचीन ग्रंथांत शास्त्रार्थ पाहतां तीन दिवस, किंवा पक्षिणी आशौच धरावें ह्मणून कोठेंही पाहिलें नाहीं. धर्माब्धिकार मात्र येक दिवस धरावें ह्मणून लिहितो, यास्तव प्रथम दिवशीं समजल्यास येक दिवस धरावें.

प्र० – व्रतबंध करून अध्यायन सांगितलें जाणत्याला संस्कृतात आचार्य ह्मणतात त्याचें आशौच शिष्यानें किती दिवस धरावें?

उ० – सोदकाचें आशौच धरण्याचा विस्तार सांगितला आहे तद्वत् धरावें.

प्र० – व्रतबंध करून अध्यायन सांगीतलें जाला, तो शिष्य मृत झाल्यास आचार्य गुरूनें आशौच किती दिवस धरावें?

उ० – सोदकाचें आशौच धरण्याचा पर्याय उक्त आहे तदनुसार धरावें.

प्र० – आचार्य गुरु पुत्राचें किंवा पत्नीचें आशौच

किती दिवस धरावें ?

उ० — तोपुत्र व्रतबंधापूर्वी मृत झाल्यास स्नान करावें. व्रतबंधोत्तर पुत्र मृत झाला आणि त्याच दिवशीं ऐकिल्यास येक दिवस धरावें. गुरुपत्नी मृत झाली आणि त्याच दिवशीं ऐकिल्यास येक दिवस धरावें.

प्र० — विद्यार्थ्यांचें आशौच आचार्यगुरुपत्नीनें, आणि गुरुपुत्रानें किती दिवस धरावें ?

उ० — आचार्यगुरुपुत्राचें आशौच धरण्याचा विस्तार उक्त आहे तद्वत धरावें.

प्र० — वेद जो सांगतो त्याला संस्कृतांत उपाध्याय असें बोलतात, त्या गुरूचें आशौच शिष्यानें. आणि शिष्याचें आशौच उपाध्याय गुरूनें किती दिवस परस्परांनीं परस्परांचें धरावें ?

उ० — प्रथम दिवशीं ऐकिल्यास येक दिवस धरावें.

प्र० — येका गावचे राहणारे व सांग वेदाध्ययन बरोबर करणारे त्यानां संस्कृतांत अनूचान ह्मणतात, प्राकृतांत गुरुबंधू ह्मणतात त्या परस्परानी परस्परांचें आशौच किती दिवस धरावें ?

उ० — प्रथम दिवशीं ऐकिल्यास येक दिवस धरावें.

प्र० — षडंगाव्यतिरीत वेदाध्ययन जे करितात त्यानां श्रोत्रीय संस्कृतांत ह्मणतात ते श्रोत्रीय गुरुबंधूनी परस्परानीं परस्परांचें आशौच किती दिवस ध०

उ० – प्रथम दिवशीं ऐकिल्यास येक दिवस धरावें.

प्र० – संबंधी नसून स्नेही आहे त्याचें आशौच किती दिवस धरावें ?

उ० – तो स्नेही अनूचान किंवा श्रोत्रीय असल्यास आणि आपले एथें मृत झाल्यास येक दिवस धरावें.

प्र० – राखलेली किंवा दासी, अथवा नाटक शाळेचें आशौच रतपुरुषानें व रतपुरुषाचें सापिंडादिकानीं किती दिवस धरावें ?

उ० – ती अन्यपुरुषाकडे रममाण नाहीं हें वास्तविक विदित असल्यास आणि ती रतपुरुषाचे ग्रहीमृत झाल्यास आणि प्रथम दिवशीं ऐकिल्यास त्या रतपुरुषानें तीन द्वितीयेत्यादि दिवशीं ऐकिल्यास स्नान करावें, आणि पुरुषाचे सापिंडानीं प्रथम दिवशीं ऐकिल्यास येक दिवस धरावें. ती अन्य ठिकाणी मृत झाली असल्यास प्रथम दिवशीं ऐकिल्यास त्या रतपुरुषानें येक दिवस धरावें, त्याचे सापिंडानीं स्नान करावें

प्र० – अग्निहोत्र्याचें आशौच समंत्रक दहन झाल्यावर धरावें ह्मणोन सांगितलें त्यास पूर्ववत धरावें किंवा कमी धरावें ?

उ० – पूर्ववत धरावें.

प्र० – शवाचें वाहणें. दहन. किंवा खनन नीचजा

तीनीं केलें त्याचा पालाशविधी केल्यापासून आशौच धरावें ह्मणोन सांगितलें त्यास पूर्ववत धरावें किंवा कमी धरावें ?

उ० — पूर्ववत धरावें.

प्र० — आपल्या जिवाचा आपल्या हाताने नाश करून मेतला त्याचे, व भ्रष्ट स्त्री, किंवा पुरुष त्याचा घटस्फोट केला नाहीं. व नपुंसक स्त्री. व नपुंसक पुरुष. किंवा राजानें मारिला त्याचें. आशौच पालाशविधी केल्यानंतर धरावें ह्मणोन सांगितलें त्यास तो कधीं करावा. व तो केल्यावर आशौच स्त्रीपुत्रादिकानीं. किती दिवस धरावें?

उ० — जे प्रश्न केलेत त्यांचा. व अन्य स्त्रीचे हरण करणार्थ मृत झाला, व चांडालाने मारिला, व चांडालाश्रय करणारा. व अन्यास शस्त्राने मारणारा, व दुसऱ्याचे ग्रहास अग्नी लावणारा, व दुसऱ्यास विष घालणारा, व स्त्रीविष धारण करणारा, व आपला धर्म सोडून अन्याचे धर्माचें आचरण करणारा, व पतीला व बाळास मारणारी, इत्यादिकाचें दहन अविधी करावें, आशौच न धरावें. मृत होऊन वर्ष झाल्यावर नारायणबलीपूर्वक पालाशविधीयुक्त, और्ध्वदेहीक कर्म करून स्त्रियेनें भ्रताराविषयीं, व भ्रताराने स्त्रीविषयीं, व पुत्रानें आईबापाविषयीं, व सपत्नीनें सपत्नीवि

षयीं दाहा दिवस धरावें, सापिंडानीं तीन दिवस धरावें, सोदकादिकानी स्नान करावें, अथवा स्त्रियादिकानी तीन दिवस धरावें, अथवा मृत होतांच तत्कालीं षोडश कृच्छ्र प्रायश्चित्त पूर्वक नारायण बलीत्यादि और्ध्वदेहीक कर्म केल्यावर माता पित्यादि सापिंड किंवा सोदक अथवा सगोत्र इत्यादिकांचें आशौच धरावयाच्या विस्तार सांगितला आहे त्याप्रमाणें धरावें.

प्र० – अशुची असतां पुराणश्रवण, व ब्राह्मण भोजन करावें किंवा नाहीं भोजन कर्त्यांना संसर्गाशौच आहे किं नाहीं ?

उ० – स्पर्शन करितां करावें. भोजन कर्त्यास नाहीं.

प्र० – अत्यासन्न तो अशुची असतां संन्यासादिक विधी करावा किंवा नाहीं ?

उ० – करावा.

प्र० – शृंगें दंष्ट्रा किंवा नखें, आहेत शस्त्रें मारण्याविषयीं ज्याची अशा जनावरापासून, किंवा सर्पदंशानें, किंवा विजेनें, किंवा पाण्यांत पडून मृत झाला किंवा चोरांनीं मारला, त्याचें आशौच केव्हां पासून व कमी किंवा जास्ती धरावें ?

उ० – मृत होतांच नारायण बली पूर्वक विधी केल्यानंतर सर्वांनीं पूर्वोक्त प्रमाणें धरावें.

प्र० – युध्यांत मृत झाल्यास आशौच किती दि-

वस धरावें ?

उ० — शवास स्पर्श अन्य जातीच्या झाला नसल्यास प्राणोत्क्रमणापासून धरावें; स्पर्श झाला असल्यास पालाश विधी झाल्यानंतर धरावें.

प्र० — कोणी पुरुष संन्याशी होऊन मृत झाल्यास आशौच धरावें किंवा नाहीं.

उ० — संन्याशी. अथवा अतुर संन्याशी होतो, त्याचें पुत्रानें, आणि स्त्रीनें, सोवळें दाहा दिवस राहावें; इतर जे शुची याना शिवूनये, सापिंडादिकानी स्नान करावें.

प्र० — शवास स्पर्श केला. किंवा धर्मार्थ शवास वाहिलें. किंवा शवाचें दहन. अथवा खनन केलें असतां आशौच किती दिवस धरावें ?

उ० — त्या प्रेताशीं मातुलादिक संबंध असल्यास तीन दिवस धरावें. नातें नसतां स्पर्शादिक दिवसास केला असतां नक्षत्र दर्शन पर्यंत, अथवा रात्री स्पर्श केल्यास सूर्योदय पर्यंत संसर्गाशौच ध०

प्र० — संसर्गाशौच कशास म्हणतात ?

उ० — जालातें प्राप्त झालें आहें त्याणें इतरास स्पर्शमात्र न करणें त्याला म्हणतात.

प्र० — मोल घेऊन स्वज्ञातीचें. किंवा श्रेष्ठ. अथवा नीच जातीचें शवास अलंकार केले. किंवा वाहिलें. अ

थवा दहन किंवा खनन केलें असतां संसर्गाशौच किती दिवस धरावें ?

उ० - मोल घेऊन अलंकारादिक करणारानां मुर्धफरास असें प्राकृतात ह्मणतात त्याणी समान किंवा श्रेष्ठ जातीचें केल्यास दाहा दिवस, नीच जातीचें केल्यास वीस दिवस धरावें.

प्र० - हरयेक ज्ञातीचे घरचें मनुष्य मृत झालें आहे आणि त्याचें घरीं कोणी राहिला. अथवा त्याचे एथील अन्न घेतलें असतां संसर्गाशौच किती दिवस धरावें ?

उ० - जितके दिवस राहील. अथवा अन्न घेईल तितके दिवस धरावें.

प्र० - आपले ज्ञातीचें, किंवा आपलेपेक्षां श्रेष्ठ वर्णाचें शवाबरोबर गेलें असतां शुध्य कशानें होतात?

उ० - स्नान करून अग्नीला स्पर्श करून घृत प्राशन करून स्नान करून ब्राह्मण, क्षत्रिय. आणि वैश्य याणी प्राणायाम करून स्नान केल्यानंतर. व स्त्रिया. आणि सत्छूद्रादिकानी प्राणायामाव्यतीरिक्त सर्व विधी केला असतां शुध्य होतात.

प्र० - आपल्यापेक्षां नीच जातीच्या शवाबरोबर गेलें असतां शुध्धी कशाने होईल ?

उ० - ब्राह्मण दिवसास गेल्यास नक्षत्र दर्शन,

रात्रौ गेल्यास प्रातःकाळ, व क्षत्रिय गेल्यास येक दिवस. वैश्य गेल्यास पक्षिणी. आशौच धरून अग्निस्पर्श व घृतप्राशन व प्राणायाम करावा. आणि स्नान करून प्राणायाम केला ह्मणजे, व या वर्णाचा स्त्रियांनीं प्राणायामाव्यतिरिक्त केलें असतां. आणि सत्‌शूद्रादिकानी, व त्याच्या स्त्रियानी तीन रात्री, व संसर्गाशौच धरून स्नानादिक प्राणायामाव्यतीरिक्त विधी केला असतां शुध्दी होईल:

प्र० – कोणी स्त्री, अथवा पुरुष उठोन गेला तो मृत झाला किंवा नाहीं हें विदित नसल्यास किती दिवसपर्यंत मार्ग प्रतिक्षा पाहून शुध्द व्हावें?

उ० – पूर्ववयस्कर असल्यास वीस वर्षे, मध्यम वय असल्यास पंधरा वर्षे, आणि उत्तर वयस्कर असल्यास बारा वर्षे. नवऱ्याने बायको विषयीं, बायकोने नवऱ्याविषयीं. व पुत्रानें मातापित्याविषयीं. व सवतीनें सवती विषयीं वाट पाहावी आणि पर्णशर विधी करून दाहा दिवस, आणि सापिंडानी तीन दिवस आशौच धरून, व सोदक इत्यादिकानी स्नान करून शुध्द व्हावें.

प्र० – सपिंडाचें अंत्य कर्म करणें प्राप्त झाल्यास अंत्य कर्म करण्या निमित्त आशौच किती दिवस धरावें?

उ०. – सापिंड दत्तक ग्रहीत पित्याचें आशौच कर्मा

र्थ धरण्याचा विचार उक्त आहे तद्वत धरावें.

प्र० – सोदक इत्यादिकाचे अंत्य कर्म करणें प्राप्त झाल्यास कर्म करण्यानिमित्त आशौच किती दिवस ध०

उ० – तीन दिवस धरावें.

प्र० – कोणी पुरुष मृत झाला, आणि त्याचे कांहीं सापिंड्यांणी आशौच धरून शुध्द झाले, नंतर मृत झाल्याची बायको येऊन पालाशविधी करून सती गेली, तिचें आशौच पूर्वी तिचा नवऱ्याचें आशौच धरून शुध्द झाले त्याणीच तिचा नवऱ्याचे आशौच धरलें नाहीं, जाणी त्याणी तिचा नवऱ्याचें आणि ती सती गेली येतन्निमित्त आशौच किती दिवस धरावें ?

उ० – ज्यानी तिचा नवऱ्याचे आशौच धरून शुध्द झाले आहेत त्याणी त्या सती विषयीं स्नान मात्र करावें आणि जा सापिंडानी तिचा नवऱ्याचें आशौच धरिलें नाहीं त्याणी तीन दिवस धरावें, सोदक इत्यादिकानी स्नान करावें

प्र० – सती जाणार ती विटाळशी आहे तर तिणे सती कधीं जावें ?

उ० – सवा मण साळी कांडून प्रेता बरोबर सती जावें

प्र० – दाहा दिवसांचे सोहेरांत दुसरा दाहा दिवसाचा अथवा कमी दिवसांचा सोहेर आल्यास पूर्व सोहेराने दुसरे सोहेराची शुद्धी होते किंवा नाहीं.

उ० - पूर्वीचाने दुसऱ्याची शुध्दी होते आणि दुसऱ्या सोहेराचा संस्कार देखिल करावा अथवा जे दिवशीं बारा दिवस होतील ते दिवशीं करावा. बाळंतिणीची मात्र शुध्दी होत नाहीं.

प्र० - तीन दिवसांचे सोयरांत दुसरा तीन दिवसांचा सोहर आल्यास पूर्वीचा सोहेराने शुध्दी होते किंवा नाही

उ० - शुध्दी होते.

प्र० - तीन दिवसांचे सोहेरात दाहा दिवसांचा सोहेर आल्यास पूर्व सोहेराने शुध्दी होते किंवा नाहीं ?

उ० - शुद्धी होत नाहीं.

प्र० - दाहा दिवसांचे सुतकांत दुसरें दाहा दिवसांचें अथवा कमी दिवसांचें सुतक आल्यास पूर्वीचाने शुध्दी होते किंवा नाहीं ?

उ० - इतरांची शुध्दी होते प्रत्यक्ष पुत्राची आणि बायकोची आणि नवऱ्याची आणि सवतीला सवती विषयीं शुध्दी होत नाहीं.

प्र० - तीन दिवसाचे आशौचात दाहा दिवसाचें आशौच आल्यास शुध्दी होते किंवा नाही ?

उ० - शुध्दी होत नाहीं.

प्र० - तीन दिवसांचा आशौचांत तीन दिवसांचे आशौच आल्यास शुध्दी होते किंवा नाहीं ?

उ० - शुध्दी होते.

प्र० - दाहा दिवसाचे सोयरांत दाहा दिवसांचे अथवा कमी दिवसांचे सूतक आल्यास सूतकाचीशुर्धी सोहेराने होत्ये किंवा नाहीं ?

उ० - शुर्धी होत नाहीं. सूतक सरल्यावर सोहेराचे कांहीं दिवस राहिले असले तथापि जे दिवशीं सूतकाची शुर्धी होत्ये त्याच दिवशीं सोहेराची शुर्धीहोत्ये, बाळंतिणीची मात्र शुर्धी होत नाहीं.

प्र० - दाहा दिवसांचें सूतकाचे दाहावे दिवसाचे रात्रीस दाहा दिवसांचे आशौच प्राप्त झालें तर दुसरें धरावें, किंवा नाहीं ?

उ० - पहिले सरल्यानंतर दोन दिवस अधीक आशौच धरावें.

प्र० - दाहा दिवसांचे सूतकाचा दाहावे रात्रीचा तीन प्रहर अथवा चवथ्या प्रहर रात्रीस दुसरे दाहादिवसांचें आशौच प्राप्त झाल्यास दुसरें धरावें किंवा नाहीं.

उ० - पहिले सरल्यानंतर तीन दिवस अधीक आशौच धरावें.

प्र० - तीन दिवसाचे आशौचाचा तिसरे उत्तररात्रीस तीन दिवसांचे अथवा कमी दिवसाचे आशौच आल्यास पूर्वीचाने शुर्धी होत्ये किंवा नाहीं ?

उ० - पूर्वीचाने शुर्धी होत्ये.

प्र० - दाहा दिवसांचे सूतकाचे दाहावे रात्रीस दुसरे दाहा दिवसांचे आशौच प्राप्त झालें ह्मणजे दोन अथवा तीन दिवस आशौच जास्त धरावें ह्मणून सांगीतलें त्यांत दुसरे आशौच आल्यास दुसऱ्याची शुध्दी होते किंवा नाहीं ?

उ० - पक्षिणींत पक्षिणी पर्यंत जी दोन दिवसांचांत पक्षिणी पर्यंतजी आणि तीन दिवसांचांत तीन दिवसापर्यंत जी आशौचे त्याची शुध्दी होते जास्ती दिवसांचे असल्यास शुध्दी होत नाहीं.

प्र० - सापिंडाचे आशौच असता आई बापाचे पुत्राला नवऱ्याचें आणि बायकोचें आणि सवत्नीचें आशौच प्राप्त झालें तर पूर्व आशौचानें शुध्दी होते किंवा नाहीं ?

उ० - शुध्दी होत नाहीं.

प्र० - मातेचा आशौचांत पित्याचें आशौच आल्यास धरावें किंवा न धरावें ?

उ० - शुध्दी होतो. कोणी ऋषीचा मते शुध्द होत नाहीं, पित्याचें आशौच संपूर्ण धरावें.

प्र० - पित्याचें आशौचांत मातेचें आशौच आल्यास मातेचें आशौच धरावें किंवा न धरावें ?

उ० - दाहावें रात्रीचे आंत आल्यास पित्याचें आशौच सरल्यावर पक्षिणी विशेष धरावें, रात्रीस समज-

त्यास तीन दिवस विशेष धरावें.

प्र० — मनुष्य किंवा गुरूं अथवा अश्व गृहांत मृत झाल्यास व कोणी मनुष्य गृहाचे शंभर हातांचे आंत मृत झाल्यास संसर्गाशौच किती वेळ धरावें.

उ० — मनुष्याचें व गुराचें व अश्वाचें शव बाहेर नेईतों पर्यंत धरून नंतर स्नान करावें.

प्र० — प्रेत पाहिलें असतां काय करावें ?

उ० — स्नान करावें.

प्र० — व्रतबंध व विवाहार्थ देवतास्थापन केल्या नंतर किंवा यज्ञदीक्षा घेतल्यावर किंवा ऋत्विजानीं मधुपर्क घेतल्यानंतर व पुरश्चरणाचा संकल्प झाल्यानंतर जननाशौच किंवा मृताशौच प्राप्त झाल्यास केव्हां पासून किती दिवस धरावें ?

उ० — उत्थापन्न अवभृत स्नान आणि पुरश्चरण झाल्यानंतर दाहा दिवस होण्यास जे शेष दिवस राहिले ते धरावें. शेष राहिले नसल्यास मृताशौच मातापित्याचें व स्त्रियेचें व भ्रताराचें व सवतीचें दाहा दिवस व सापिंडाचे तीन दिवस धरावें.

प्र० — अनंतादि व्रतें, चूडाकर्म, होम, दान, किंवा श्राद्ध, यांचा संकल्प झाल्यावर व राजा सिंहासनारूढ असतां व योद्धा युद्धांत जात असतां जनन किंवा मृताशौच आल्यास तें केव्हां पासून धरावें ?

उ० - व्रताचीं आणि कर्मांचीं समाप्ती व युध्दानंतर व सिंहासनावरून उतरल्यावर धरावें.

---

## अस्पर्शाचा विचार.

प्र० - जी स्त्री तेरा दिवसानंतर अस्पर्श होणारी त्यांतीं पूर्वीं झाल्यास अस्पर्श किती दिवस राहावें.

उ० - दाहावे दिवशीं झाल्यास स्नान करावें, अकरावें दिवशीं झाल्यास येकरात्र, बारावें दिवशीं झाल्यास दोन रात्री, आणि तेरावे दिवशीं झाल्यास त्रिरात्र अस्पर्श राहून स्नान करावें.

प्र० जी स्त्री विसा दिवसांनंतर अस्पर्श होणारी त्यांतीं पूर्वीं झाल्यास अस्पर्श किती दिवस राहावें ?

उ० सत्रावे दिवशीं झाल्यास स्नान करावें, अठरावे दिवशीं झाल्यास येकरात्र, येकोणीसावे दिवशीं झाल्यास दोनरात्री, आणि विसावे दिवशी झाल्यास त्रिरात्र अस्पर्श राहून स्नान करावें.

प्र० रात्रीस स्त्री अस्पर्श झाल्यास प्रथम दिवस कोणता ध०

उ० जननाशौचांत उक्त आहे तद्वत धरावा.

---